**<u>सं. फौ. ख. क्र. १/२०२४</u>**
**<u>निशाणी क्र.२१</u>**

**<u>फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र. २:</u>**

कारणे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

नांव :– श्री. सुनिल सरोजभाई शहा
वय :– ६८ वर्षे,
धंदा :– –
राहणार :– खराडी, पुणे.

**<u>फिर्यादीतर्फे वकील श्रीमती अनुराधा पडवळ यांच्यामार्फत सुरु :–</u>**

०१. सन २०२२–२३ मध्ये माझा पत्ता बिबवेवाडी पुणे सर्वे नंबर ६१३/६१४/६१५ गंगाधाम ए सहकारी संस्था फेज टू, बंगलो सोसायटी हा होता. आरोपी सचिन गांधी हे मला माहित आहेत. ज्या ठिकाणी वृक्षतोड झाली त्या जागेचा मी पुर्वी मालक होतो. सदर जागेचा बँकेने दिनांक ३०.०१.२०२२ रोजी ताबा घेऊन त्याचा लिलाव केला होता. सन २००२ साली सदर जागेवर बांधकाम करण्याकरीता पुणे महानगरपालिकेतर्फे कमींन्समेंट सर्टिफिकीट मला देण्यात आले होते. सदर ठिकाणी सन २००२ ते २०११ या कालावधीमध्ये मी झाडे लावले होती व त्याबाबत पुणे महानगरपालिका यांचेकडे माहिती सादर केल्यानंतर मला पुणे महानगरपालिकेकडुन ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. भोगवटा पत्र देण्या करीता सदर ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले. त्या ठिकाणी मी ८ झाडांचे संवर्धन केलेले होते. सदर ना हरकत प्रमाणपत्र दिनांक ०५.०७.२०११ रोजी देण्यात आले होते. सदर ना हरकत प्रमाणपत्र मध्ये सदर आठ झाडांचे वय व वर्णन नमूद केलेले आहे. सन २०११ ते २०२२ या कालावधीमध्ये मी घटना ठिकाणी असलेल्या जागेमध्ये राहात होतो. सन २०२२ पर्यंत मी लावलेली सर्वे झाडे अस्तित्वात होती. मी फेडरल बँकेकडे मी तारण ठेवलेल्या घटना ठिकाणावरील जागेचा दिनांक ३१.०३.२०२२ रोजी ताबा दिला व त्या दिवसापर्यंत सदरची झाडे व्यवस्थीतपणे अस्तित्वात होती. सदरचा लिलाव हा बेकायदेशीर असल्याने तो मला मान्य नव्हता त्यामुळे मी सचिन गांधी व इतर यांचेविरूद्ध पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई केली. त्यानंतर मला मी सदर जागेमध्ये लावलेली झाडे ही बेकायदेशीरपणे काढुन टाकल्याचे निदर्शनास आले त्यामुळे मी पुणे

महानगरपालिका यांचेकडे १९.०४.२०२३ रोजी निशाणी १३ वरील तक्रारी अर्ज दिला होता. मी माझ्या तक्रारी अर्जासोबत सन २०११ मध्ये अस्तित्वात असलेल्या झाडांचे फोटो दाखल केलेले आहेत. सदर जागेमध्ये आरोपी यांनी अनाधिकृत बांधकाम करून अनाधिकृतपणे झाडांची तोड केलेली आहे व त्याबाबतचे फोटो देखील मी सादर केलेले आहेत. सदर अनाधिकृत बांधकामाबाबत व वृक्षतोडीबाबत यांनी आरोपी यांना नोटीस दिल्या होत्या याबाबत मला माहिती आहे व त्यासंदर्भात दिवाणी दावे देखील प्रलंबित आहेत. सदर ठिकाणी विनापरवाना वृक्षतोड केली असल्याने पुणे मनपा यांनी भोगवटा पत्र दिनांक ११.०३.२०२५ रोजी रद्द करण्याबाबत बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय यांनी बांधकाम विभाग झोन क्र.५ यांना कळविले होते. त्याबाबत नियमित दिवाणी मुकदमा नंबर १०१८/२०२४ हा या न्यायालयात दाखल करण्यात आला व त्यामधील तुर्तातूर्त मनाई बाबतचा अर्ज मा. न्यायालयाने नामंजुर केला आहे याबाबत मला माहिती आहे. दिनांक २१.०५.२०२५ रोजी बांधकाम विभाग झोन ५ यांनी आरोपी यांना सर्व विनापरवाना अनाधिकृत बांधकाम काढून घेणेबाबत नोटीस दिली होती. मी सदर जागेमध्ये लावलेली झाडे आज अस्तित्वात नाहीत. मी तक्रारी अर्ज दिल्यानंतर पुणे महानगरपालिका तर्फे सदर ठिकाणी पंचनामा निशाणी १४ करण्यात आला आता मला तो पंचनामा दाखवण्यात आला त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पंचनाम्यामध्ये नमूद केलेल्या झाडांव्यतीरीतक्त अनेक औषधी झाडे सदर जागेत होती ती झाडे देखील विनापरवाना काढून टाकण्यात आली आहेत व त्याबाबत मी मार्केटयार्ड पोलीस स्टेशन यांचेकडे देखील दिनांक २५.०८.२०२३ रोजी तक्रारी अर्ज दिला होता. सदर वृक्षतोड ही आरोपी यांनी केलेली आहे.

**सरतपास पुर्ण...**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. ए. एस. क्षीरसागर यांच्यामार्फत सुरु</u> :–**

०२. पंचनामा निशाणी १४ मध्ये माझा लिहिलेला पत्ता मी स्वतः लिहिलेला नाही. श्री. डोळस यांनी सदरचा पत्ता मी पुर्वी त्या ठिकाणी राहात असल्याने तो पत्ता लिहिलेला आहे. पंचनाम्यामधील मजकूर खरा व बरोबर असल्याने मी त्यावर सही केलेली होती. आता मला फिर्याद सोबत दाखल केलेला दिनांक २५.०७.२००२

रोजीचा बांधकाम मान्यतेचा नकाशा सीसी नंबर २३४५ दाखवण्यात आला तो बरोबर आहे. सदरचा नकाशा साक्षीदार यांना मान्य असल्याने **निशाणी २२** देण्यात आली. सदर नकाशामध्ये झाडांबाबत नोंद केलेली आहे व ती बरोबर आहे. आता मला दिनांक २८.०६.२०११ रोजी मी उद्यान विभाग पुणे मनपा यांचेकडे सादर केलेले हमी पत्र दाखवण्यात आले. ते बरोबर आहे. सदर हमीपत्र साक्षीदार यांनी मान्य केल्याने त्यास **निशाणी २३** देण्यात आली. सदरचे हमीपत्र मी सन २०११ साली त्या ठिकाणी कोणतीही वृक्षतोड झालेली नाही याबाबत पुणे मनपा यांना लिहून दिलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझा तक्रारी अर्ज निशाणी १३ व पंचनामा निशाणी १४ मध्ये सदरची वृक्षतोड कधी व कशाप्रकारे केली याबाबत व त्याबाबतची तारीख व वेळ याबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरची वृक्षतोडीची घटना मी स्वतः पाहिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, वृक्षतोड झाल्यानंतर त्या ठिकाणी असलेल्या लाकुडफाटा कशाप्रकारे त्या ठिकाणाहून नेण्यात आले हे मी पाहिले नाही.

०३. निशाणी १३ वरील तक्रार मी सदरच्या दिवशी दुपारी १२ च्या दरम्यान पुणे महानगरपालिका कार्यालयामध्ये दिली होती व सदरची तक्रार देण्यापुर्वी मी घटना ठिकाणी गेलो होतो. सदरची तक्रार दुपारी १२ वाजता दिल्यानंतर मी पुन्हा पुणे महानगरपालिका कार्यालयामध्ये जाऊन चौकशी केली असता दुपारी ०४.१६ वाजता त्यावर आवक क्रमांक टाकण्यात आलेला नव्हता. मी त्या ठिकाणी गेल्यावर दुपारी ०४.१६ वाजता माझ्या तक्रारी अर्जावर आवक क्रमांक, तारीख व वेळ टाकण्यात आली व पुढील कार्यवाही वरिष्ठांच्या आदेशाने केली जाईल असे मला सांगण्यात आले होते.

०४. आता मला दिनांक ०५.०७.२०११ रोजी उद्यान विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र दाखवण्यात आले. त्यासोबत ना हरकत प्रमाणपत्र देण्यासंदर्भातील अहवाल देखील उद्यान विभागाने दिलेला होता. सदरचे ना हरकत प्रमाणपत्र व अहवाल साक्षीदार यांना मान्य असल्याने त्यास **निशाणी २४** देण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी २४ मध्ये लिहिलेल्या वृक्षांचे वय व वर्णन, तसेच पंचनाम्यामधील वृक्षांचे वण व वर्णन हे एक सारखेच आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, पंचनामा करतेवेळी त्या ठिकाणी झाडेच अस्तित्वात नसल्यामुळे पंचनाम्यामध्ये अंदाजे वर्णन लिहिलेले

आहे. फिर्याद सोबत दाखल केलेले फोटो हे मी स्वतः माझ्या मोबाईल मधून काढलेले होते. सदरचे फोटो मी सदर बंगल्याच्या आवारात जाऊन स्वतः काढलेले होते परंतु मला बंगल्याच्या आतमध्ये मला तेथे असलेल्या लोकांनी जाऊ दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी मी घटना ठिकाणी गेलो होतो त्या वेळी सदरचा बंगल्याचा ताबा हा आरोपी यांना दिला होता किंवा नाही याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सादर केलेल्या फोटो बाबत भारतीय पुरावा कायदा कलम ६५ब प्रमाणे प्रमाणपत्र मी सादर केलेले नाही परंतु सदरचे प्रमाणपत्र मी सादर करू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, मी घटना ठिकाणी कधीही गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सांगण्याप्रमाणे पंचनामा निशाणी १४ तयार करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मध्ये व आरोपी यांच्यामध्ये अनेक दिवाणी प्रकरणे प्रलंबीत असल्याने मी आरोपींना त्रास देण्याच्या उद्देशाने निशाणी १३ वरील खोटी तक्रार दिली व निशाणी १४ वरील पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनाम्यावर मी पुणे मनपा कार्यालयामध्ये जाऊन सही केलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, घटना ठिकाणावरील जागेचा ताबा आरोपींना मिळण्यापुर्वीच वृक्षतोड करण्यात आलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

| | समक्ष, | श्रवणोत्तर स्वीकृत, |
|---|---|---|
| | **सही/–** | **सही/–** |
| ठिकाणः पुणे | **(श्रीमती एन. एस. सय्यद)** | **(श्रीमती एन. एस. सय्यद)** |
| दिनांकः ०२/०४/२०२६. | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, |
| | (मनपा न्यायालय), जि. पुणे. | (मनपा न्यायालय), जि. पुणे. |